CNR No.MHSI010006962017

## निशाणी ६० खालील आदेश

अपेलंट नं.१ब यांनी रिस्पॉडेंट नं ०५ यांचे वारस दाखल करण्यासाठी परवानगीचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जावर रिस्पॉडेंट नं. २ यांनी म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे. अपेलंट व रिस्पॉडंट यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अपेलंटचे अर्जामध्ये कथन की, रिस्पॉडेंट नं. ५ इम्रान अब्दुल सत्तार खान हे दिनांक २४/०९/२०२३ रोजी जोगेश्वरी, मुंबई येथे मरण पावलेले आहेत. त्यांना रिस्पॉडेंट नं. ५अ, ५ब व ५क हे वारस आहेत. याशिवाय दुसरे वारस नाहीत. सदर अपिल प्रलंबित असताना अपेलंट यांना रिस्पॉडेंट यांच्या मृत्यूची माहिती वेळेत मिळाली नाही. त्यामुळे माहिती झाल्यानंतर लगेच वारसाचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब विलंबनाचा अर्ज दाखल केलेला आहे. वारस हे वेळेत दाखल न केल्यामुळे त्यांच्याविरूध्द अपिल अबेट झाले असल्यामुळे सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब रिस्पॉडेंट नं. ५ चे वारस अपिलामध्ये दूरूस्ती करून दावा पुढे चालवण्यासाठी परवानगी मागितलेली आहे.

३. रिस्पॉडंट नं. २ यांनी अर्जावर म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे की, अपेलंट यांनी दिलेले कारण स्वीकृत करता येणार नाही. दिलेले कारण कायदेशिर नाही. त्यामुळे तो चालण्यास पात्र नसल्यामुळे तो अर्ज नामंजूर करावा.

४. अपेलंट यांचा अर्ज, त्यावरील रिस्पॉडंट याचे म्हणणे याचा विचार करता अपेलंट यांनी रिस्पॉडेंट नं. ५ यांचे वारस वेळेत अपिलामध्ये समाविष्ट केलेले नाही. त्यानंतर अपेलंट यांचा विलंबमाफीचा अर्ज, अबेटमेंट सेटअसाईडचा अर्ज मंजूर करण्यात आलेला आहे. त्यामुळे रिस्पॉडेंट नं. ५ चे वारस अपिलाच्या कामी आवश्यक आहेत. त्यामुळे यावरील कारणास्तव मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१. अपेलंट यांचा निशाणी ६० वरील अर्ज हा मंजूर करण्यात येत आहे.

२. अपिलंट यांना अपिलामध्ये रिस्पॉडेंट नं. ५ चे वारस दाखल करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2025.11.12 10:44:22 +0530

सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांक– १०/११/२०२५

( श्री.एस.एस.इंदलकर)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
सिंधुदुर्ग–ओरोस.